
VOLUME No.68, ISSUE No.05, JANUARY-2020 ISSN (Online): 0474-9030

SDGS 2020
OUR HERITAGE
Impact Factor (2020): 6.8
UGC Care Listed, Multidisciplinary Journal for Research Publication

Special Issue on

# Sustainable Development Goals



Executive Editor
Dr. Deepak M. Bharti

Chief Editor
Prin. Dr. Shivdas Z. Shirsath

Copyright © Authors 2020

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*


| | | | |
|---|---|---|---|
| | upay | | |
| 160 | न्याय प्रक्रियेत जनहित याचिका : एक अभ्यास<br>Nyay prakriyet janhit yachika : Ek abhyas | माने परमेश्वर मुक्तीराम<br>Mane Parmeshwar Muktiram | 753-755 |
| 161 | जमीनीचे अवमुल्यन : कारणे आणि उपाय<br>Jaminiche avmulyan : Karne aani upay | प्रा.डॉ.चिताडे एन.पी.<br>Prof. Dr. Chitade N.P. | 756-758 |
| 162 | शाश्वत विकास : उद्दिष्टे आणि लक्ष्ये<br>Shaswhat vikas : uddishthe aani lakshe | डॉ.शिवाजी पाते<br>Dr. Shivaji Pate | 759-762 |
| 163 | शाश्वत विकास व भारतातील महीला सबलीकरण धोरण<br>Shashwat vikas va bhartatail mahila sabalikaran dhoran | गोविंद द.बावस्कर<br>Govind D. Bawaskar | 763-764 |
| 164 | शाश्वत विकास आणि पर्यावरण<br>Shashwat vikas aani paryawaran | प्रा.राजाभाऊ बंकटराव भगत<br>Prof. Rajabhau Bankatrao Bhagat | 765-768 |
| 165 | भारतातील अन्नसुरक्षा<br>Bhartatil annsuraksha | प्रा.डॉ.हरी साधू वाघमारे<br>Prof. Dr. Hari Sadhu Waghmare | 769-773 |
| 166 | शाश्वत विकास काळाची गरज<br>Shashwat vikas kalachi garaj | प्रा.डॉ.जाधव मिनाक्षी भास्कर<br>Prof. Dr. Jadhav Minakshi Bhaskar | 774-777 |
| 167 | भारतीय उच्च शिक्षणातील कला शाखेचे शिक्षण दशा व दिशा<br>Bhartiya uccha shikshanatil kala shakheche shikshan dasha va disha | डॉ.टी.एस.बिडवे<br>Dr. T.S. Bidwe | 778-780 |
| 168 | शाश्वत विकासाची उद्दिष्टे<br>Shashwat vikasachi uddishte | प्रा.धर्मराज कटके<br>Prof. Dharmraj Katke | 781-784 |
| 169 | शाश्वत विकासासाठी दारिद्र्य निर्मूलन<br>Shashwat vikasasathi daridrya nirmulan | प्रा.डॉ.वाय.वी.चव्हाण,<br>Prof. Dr. Y.B. Chavan<br>प्रा.डॉ.मेघराज जनार्धन मोरे<br>Prof. Dr. Meghraj Janardhan More | 785-788 |
| 170 | लिंगभेद आणि स्त्री-पुरुष समानता चळवळ<br>Lingbhed aani stri-purush samanata chalwal | डॉ.पी.डी.सूर्यवंशी<br>Dr. P.D. Suryawanshi | 789-794 |
| 171 | शाश्वत विकासात पाण्याचे महत्व<br>Shashwat vikasat panyache mahattva | प्रा.डॉ.पांडुरंग मुंढे<br>Prof. Dr. Pandurang Mundhe | 795-797 |
| 172 | लिंगभाव असमानता स्त्रियांचे प्रश्न आणि उपाय योजना<br>Lingbhav asamanta striyanche prashna aani upay yojna | प्रा.पोकळे एस.एम.<br>Prof. Pokale S.M. | 798-800 |
| 173 | लोकशाहीमध्ये न्यायाची भूमिका<br>Lokshahimadhe nyayachi bhumika | डॉ.प्रशांत भाऊसाहेब सोळंके<br>Dr. Prashant Bhausaheb Solanke | 801-804 |
| 174 | धर्म आणि भारतीय सामाजिक वास्तव<br>Dharm aani bhartiya samajik vastav | प्रा.राहुल चोखाजी साळवे<br>Prof. Rahul Chokhaji Salve | 805-806 |

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

# शाश्वत विकासाची उदिष्टे

**प्रा. धर्मराज कटके**
कला व विज्ञान महाविद्यालय
गढी.ता गेवराई, जि.बीड
*Email:kaktedharmaraj@gmail.com*

संक्षिप्त गोषवारा *(Abstract)* :

आज भांडवलशाहीच्या काळात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षण हे मानवाला त्याला स्वत:ची ओळख करुन देणे त्यासाठी केवळ पदव्या देणारे शिक्षण नव्हे तर गुणवत्तपूर्ण उपयोगी शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत सर्व समाज घटकांना सहभागी करुन घेणे गरजेचे आहे. तसेच महीलांवर होणारे अन्याय, अत्याचार यांसारख्या घटना थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी महीला सक्षमीकरणाव भर देणे गरजेचे आहे. विकसीत, विकसनशील व गरीब देशातील समस्या दूर करण्यासाठीं जागतीक स्तरावर प्रयत्न करण्याची गरज आहे.

**Keyword: शाश्वत विकास**

**प्रस्तावना**

शाश्वत विकास म्हणजे मानवाने आपल्या सद्यस्थितीतील गरजा पूर्ण करतांना आपल्या पुढील पिढीच्या विकासास किंवा त्यांच्या गरजेस कोणतेही बाधा पोंहचणार नाही. अशा रितीने केलेला विकास होय. शाश्वत विकासाचा मुख्य उद्देशहा मानव हा पृथ्वीवरील एका साखळीचा भाग आहे. त्या साखळीच्या मर्यादा लक्षात घेवून त्याचा वापर करावयास भाग पाडणे होय. अलिकडे जागतिकीकरण, अैद्योगीकरणाच्या काळात मानवाने नैसर्गिक संसाधनाचा वापर अनियंत्रीतपणे केला आहे. हा विकास पुढील पिढीच्या गरजांपूर्ण करण्यासाठी बाधा निर्माण करणारा नसावा. अनियंत्रीत इंधनउपसा, वृक्ष तोड, अर्निबंध पाणी वापर व उपसा, अद्योगिकीकरण आणि लोकसंख्यावाढ या बाबींमुळे शाश्वत विकासात बाधा निर्माण होत आहे. त्यासाठी नैसर्गिक आणि मानवनिर्मित संसाधनाचा जपून व योग्य तो वापर करणे अपेक्षित आहे. सौरउर्जा, पवनउर्जा, यांसारख्या नवीकरणक्षम उर्जास्त्रोतांचावापर हा शाखत विकासाचा पाया आहे. मानव हा सतत अधिकसंसाधना चा वापर करत असतो. ''जीवो जीवस्य जीवनम्'' हे निसर्गचक्र आहे. म्हणून मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर नैसर्गीकसाधनसंपत्तीचा वापर करताना आपण निसर्गाचा घटक आहोत. याची जाणीव शाश्वत विकास या संकल्पने मध्ये अपेक्षित आहे.

**शाश्वत विकास संकल्पनेचा उगम :-**

संयुक्त राष्ट्र संघानेइ.स.१९८७ मध्ये जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगा (World Commission on Enviommen and Development / WCED) ची स्थापना केली. आयोगाचे अध्यक्ष नॉर्वे चे पंतप्रधान 'ग्रो हारलेम ब्रुण्डलॅण्ड' हे होते. ब्रुण्डलॅण्ड यांच्या नावावरुन आयोगाला ब्रुण्डलॅण्ड असे म्हणतात. आयोगाने पृथ्वीवरील सामाजिक. पर्यावरणीय समस्यांचे निरीक्षण करुन अभ्यास करुन पृथ्वीवरील

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "Sustainable Development Goals"

संसाधनाचा भावी पिढीसाठी राखून वापर कसा करता येईल याचा शोध घेतला. आयोगाने सादर केलेल्या 'Our Common Future' या अहवालात शाश्वत विकास ही संकल्पना व तिच्या व्याख्या केलेल्या आहेत.

व्याख्या :-

१) जागतिक पर्यावरण व विकास आयोग :-

"जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करता येतो त्या विकासास शाश्वत विकास असे म्हणतात.

२) वर्तमान कालीन गरजांची पूर्तता करत असतांना या प्रयत्नांचा परिणाम भविष्यकालीन गरजांवर होणार नाही ही बाब विचारात घेवून साध्य केलेला विकास म्हणजे 'निरंतर विकास' होय.

पर्यावरणीय बाबींचे महत्त्व अबाधित ठेवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय.

शाश्वत विकास उद्दिष्टे २०१५:-

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सप्टेंबर २०१५ मध्ये एकूण उद्दिष्टे असणारा २०३० साठीचा शाश्वत विकासचा अजेंडा स्वीकारला. हयामध्ये १७ उद्दिष्टे आणि त्याअंतर्गत १६९ ध्येये सदस्य देशांनी २०१६ ते २०३० या कालावधीत साध्य करावयाची आहेत.

ध्येये :- १७

१) सर्व प्रकारच्या गरीबांचे निर्मूलन करणे.
२) भूक संपवणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषण आहार उपलब्ध करुन देणे आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.
३) सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे.
४) सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उलब्ध करणे.
५) लिंगभावाधिष्ठीत समानता व महीला आणि मुलींचे सक्षमीकरण साधणे.
६) पाण्याची व स्वच्छतेच्या संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करणे.
७) सर्वांना अल्पखर्चिक विश्वासाई, शाश्वत आणि आधुनिक उर्जा साधने उपलब्ध करुन देणे.
८) आरोग्यपूर्ण आयुष्य सुनिश्चित करणे व सर्व वयोगटातील नागरिकांचे कल्याण साधणे.
९) पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करणे, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरण आणि कल्पकतेला वाव देणे.
१०) विविध देशांमधील असमानता दूर करणे.
११) शहरे, मानवी वस्त्या, अधिक समावेचक, सुरक्षित, संवेदनशील आणि शाश्वत करणे.
१२) उत्पादन आणि उपभोगाच्या पद्धती शाश्वत रुपात आणणे.
१३) हवामानावदल आणि त्याच्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे.
१४) महासागर आणि समूहांचे संवर्धन करणे तसेच त्यांच्याशी संबंधित संसाधनाचा शाश्वतपणे वापर करणे.
१५) परिस्थितीकीय व्यवस्थांचा (Ecosystem) शाश्वत पदधतीने वापर करणे, वनाचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीकरणाशी मुकाबला करणे, जमिनीचा कस कमी होण्याची प्रकिया आणि जैवविविधतेची हानी रोखणे.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

संसाधनाचा भावी पिढीसाठी राखून वापर कसा करता येईल याचा शोध घेतला. आयोगाने सादर केलेल्या 'Our Common Future' या अहवालात शाश्वत विकास ही संकल्पना व तिच्या व्याख्या केलेल्या आहेत.

व्याख्या :—

१) जागतिक पर्यावरण व विकास आयोग :—

"जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करता येतो त्या विकासास शाश्वत विकास असे म्हणतात.

२) वर्तमान कालीन गरजांची पूर्तता करत असतांना या प्रयत्नांचा परिणाम भविष्यकालीन गरजांवर होणार नाही ही बाब विचारात घेवून साध्य केलेला विकास म्हणजे 'निरंतर विकास' होय.

पर्यावरणीय बाबींचे महत्त्व अबाधित ठेवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय.

शाश्वत विकास उद्दिष्टे २०१५:—

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सप्टेंबर २०१५ मध्ये एकूण उद्दिष्टे असणारा २०३० साठीचा शाश्वत विकासचा अजेंडा स्वीकारला. हयामध्ये १७ उद्दिष्टे आणि त्याअंतर्गत १६९ ध्येये सदस्य देशांनी २०१६ ते २०३० या कालावधीत साध्य करावयाची आहेत.

ध्येये :— १७

१) सर्व प्रकारच्या गरीबांचे निर्मूलन करणे.

२) भूक संपवणे, अन्न सुरक्षा व सुधारित पोषण आहार उपलब्ध करुन देणे आणि शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.

३) सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे.

४) सर्वसमावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण उलब्ध करणे.

५) लिंगभावाधिष्ठीत समानता व महीला आणि मुलींचे सक्षमीकरण साधणे.

६) पाण्याची व स्वच्छतेच्या संसाधनाची उपलब्धता सुनिश्चित करणे.

७) सर्वांना अल्पखर्चिक विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक उर्जा साधने उपलब्ध करुन देणे.

८) आरोग्यपूर्ण आयुष्य सुनिश्चित करणे व सर्व वयोगटातील नागरिकांचे कल्याण साधणे.

९) पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करणे, सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरण आणि कल्पकतेला वाव देणे.

१०) विविध देशांमधील असमानता दूर करणे.

११) शहरे, मानवी वस्त्या, अधिक समावेचक, सुरक्षित, संवेदनशील आणि शाश्वत करणे.

१२) उत्पादन आणि उपभोगाच्या पद्धती शाश्वत रुपात आणणे.

१३) हवामानावदल आणि त्याच्या दुष्परिणामांना रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे.

१४) महासागर आणि समूहांचे संवर्धन करणे तसेच त्यांच्याशी संबंधित संसाधनाचा शाश्वतपणे वापर करणे.

१५) परिस्थितीकीय व्यवस्थांचा (Ecosystem) शाश्वत पदधतीने वापर करणे, वनाचे शाश्वत व्यवस्थापन, वाळवंटीकरणाशी मुकाबला करणे, जमिनीचा कस कमी होण्याची प्रकिया आणि जैवविविधतेची हानी रोखणे.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

१६) शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजव्यवस्थांना प्रोत्साहन देणे, त्यांची शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करणे. सर्वांची न्यायापर्यंत पोहोच स्थापित करण्यासाठी विविध पातळयांवर परिणामकारक उत्तरदायी आणि सर्व समावेशक संस्था उभा करणे.

युनोच्या वर्ल्ड अर्बनायझेशन अहवालानुसार सद्यस्थितीत भारत, चीन, नायजेरिया या देशात मोठया प्रमाणात शहरीकरणाचा वेग वाढलेला आहे. यु.एन.डी.ए.एस.ए. चे लोकसंख्या विभागाचे संचालक, जॉन विल्मोथ म्हणतात "शाश्वत शहरे तेव्हाच उभी राहू शकतील जेंव्हा त्यांना योग्य तितका शुदध आणि स्वच्छ गोडया पाण्याचा पुरवठा होईल." अलिकडील काळात औद्योगिक घटक आणि शेतकरी यांच्यात पिण्याच्या पाण्यासाठी ओढाताण होताना दिसत आहेत उद्योग आणि शेतकरी यांना पाणी वाटप करताना शासनास कसरत करावी लागत आहे. परंतु शाश्वत औद्योगिक विकासासाठी शाश्वत पाण्याचा पुरवठा होणे आवश्यक आहे. शाश्वत औद्योगिक विकासातून रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील. उद्योग क्षेत्राप्रमाणे कृषी क्षेत्रात जगात एकूण उपसा झालेल्या पाण्यापैकी ७० टक्के पाणी सिंचनासाठी वापरले जात असते. विकसनशील देशात हेच प्रमाण ९० टक्के आहे. जागतिक उर्जा उत्पादनांपैकी अपारंपरिक उर्जा स्त्रोतांचा वापर अगदी तुटपुंजा स्वरुपाचा आहे. त्याच्या वापरासाठी समाजाची मानसिकता निर्माण करणे. कमीत कमी भांडवलात अशा उर्जा साधनांची निर्मिती केली पाहीजे व ते वापरास चालना दिली पाहीजे.

शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत अनेक आव्हाने आहेत. मानवी समाजाच्या आजवरच्या पर्यंतच्या काळात पर्यावरणीय व्यवस्थे बाबत निर्माण झालेली दरी मिटवणे, हे सगळयात मोठे आव्हान आहे. कारण मानवी समाज, पर्यावरणीय व्यवस्था आणि आधुनिक विकासाची संकल्पना यामधून, एक नवी व्यवस्था ही निर्माण झाली आहे. तसेच अलीकडे जैव विविधता, पर्यावरण, हवामान याविषयी नवीन माहीती, पुरावे आणि त्याबददलची विज्ञान निष्ठ समज यामध्ये वाढ होत आहे. यामुळे ही दरी कमी होत असल्याचे दिसून येते.

शाश्वत विकासाची व्यवस्था निर्माण करणे आज एक आव्हान आहे. शाश्वत विकासात गरीबी, भूकबळीची समस्या दूर करणे अपेक्षित आहे. मानवाने स्वत: चा भौतिक विकास करण्यासाठी नैसर्गिक संसाधनाचा करण्यात येणारा वापर सुयोग्यरितीने गरजेचे आहे. पिण्यासाठी स्वच्छ व शुध्द पाणी सर्व मानव समूहाला उपलब्ध होणे गरजेचे आहे. पाणी वाटपा वरुन उद्योग—शेती, शहरे आणि ग्रामीण भाग यांच्यात अति ओढाताण होत असल्याचे दिसून येते. कमीत कमी पाण्याचा वापरावर उद्योग, शेतीचा विकास होणे गरजेचे आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर उर्जा निर्मितीसाठी केला जात आहे. त्याला पर्याय म्हणून अपारंपारिक उर्जा साधनांची किफायतशीर दरात उपलब्ध करणे आवश्यक आहे. जनतेला अपारंपारिक उर्जा साधनांची उपलब्धता करुन देणे हे अगत्याचे आहे. शहरीकरणात होत असलेली अफाट वाढ ही ग्रामीण भागात औद्योगिकरणाचे विकेंद्रीकरण करुन, पायाभूत सोयी—सुविधा निर्माण करुन थांबवणे गरजेचे आहे. हरित क्रांती नंतरच्या काळात कृषी उत्पादनाचा दर्जा त्या घसरत चालल्याचे या दिसून येतो परिणाम स्वरुप अन्नधान्याची गुणवत्ता खालावल्यामुळे मानवी जीवनाच्या गुणवत्तेचा स्तर निम्न होत चालल्याचे दिसून येते. मानवाचे आर्युमान घटलेले दिसून येते. कृषी क्षेत्रात सेंद्रीय शेती सारखे प्रयोग राबवणे गरजेचे आहे. शाश्वत शेती विकासाच्या योजनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. मानवी जीवनाच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी अन्न धान्याची गुणवत्ता वाढणे गरजेचे आहे. त्यासाठी पर्यावरणाची अवनती रोखणे महत्त्वाचे आहे. 'झीरो बजेट' शेती सारखे प्रयोगास प्रोत्साहनात्मक योजना शासना कडून राबवणे गरजेचे आहे. मानवी जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आयुर्वेद, पारंपारिक उपचार पध्दतीचा वापरास देखील प्राधान्य गरजेचे आहे.

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "Sustainable Development Goals"

आज भांडवलशाहीच्या काळात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षण हे मानवाला त्याला स्वत:ची ओळख करुन देणे त्यासाठी केवळ पदव्या देणारे शिक्षण नव्हे तर गुणवत्तपूर्ण उपयोगी शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत सर्व समाज घटकांना सहभागी करुन घेणे गरजेचे आहे. तसेच महीलांवर होणारे अन्याय, अत्याचार यांसारख्या घटना थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी महीला सक्षमीकरणाव भर देणे गरजेचे आहे. विकसीत, विकसनशील व गरीब देशातील समस्या दूर करण्यासाठी जागतीक स्तरावर प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच हवामानातील बदलांमुळे आज दुष्काळ, अतिवृष्टी, वादळे, वाळवंटीकरण बर्फवृष्टी इत्र सारख्या समस्या निर्माण होत आहेत. त्यासाठी पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणास महत्त्वाचे आहे संपूर्ण मानव समाजामध्ये शांततापूर्ण आणि सर्व समावेशक कार्यास प्रोत्साहन देणे. न्यायाधिष्ठीत समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी विविध संस्थांना विविध पातळ्यांवर उत्तरदायी आणि सर्वसमावेशक संस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

संदर्भसूची :—

[1] शहरातूनही शाश्वत विकास —. स्वामीनाथन रामनाथन
[2] शाश्वत विकासाची सामाजिक किंमत —दिपक घैसास
[3] विकिपीडीया
[4] The concept of sustainable development – Rachel – Emas; Florida International University.
[5] The sustainable Development Goals 2030 Agenda.
[6] Finacing sustainable Development – Magdalena 2100, Brunos Sergi.
[7] Sustainable cities Reimagined – Stanistav Shmelev.